**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक २९ एप्रिल २०२५**

**ठळक बातम्या**

- **संशोधन आणि डीप टेकमध्ये भारताची क्षमता वाढवण्यासाठी यूग्म परिषदेच्या आयोजनातून बळ मिळेल- पंतप्रधान नरेंद्र मोदी.**
- **पहलगाम हल्ल्तातील मृतांच्या कुटुंबियांना पन्नास लाखांची मदत - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस-इलेक्ट्रिक वाहन, जहाजबांधणी धोरणासही मान्यता.**
- **राज्याला ऊर्जा संपन्न बनविण्यासाठी उदंचन जलविद्युत प्रकल्पांवर राज्य शासनाने केंद्रित केले लक्ष- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती.**
- **नागपूर वाहतूक पोलिसांसाठी उष्माघात संरक्षण उपक्रम.**

युग्म- पंतप्रधान नरेंद्र मोदी

विकसित भारताच्या तंत्रज्ञानातल्या भविष्याशी संबधित सर्व भागीदार युग्म या परिषदेत एकत्र आले आहेत. असं सांगत प्रधानमंत्र्यांनी भारतान तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात केलेली प्रगती नमूद केली. युग्म या धोरणात्मक परिषदेला आज दिल्लीत भारत मंडपम इथं सुरुवात झाली. त्या परिषदेला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी संबोधित केलं. भारताची संशोधन क्षमता आणि डीप टेकमध्ये भारताची क्षमता वाढवण्यासाठी जे प्रयत्न होत आहेत त्याला या परिषदेच्या आयोजनातून बळ मिळेल असं ते म्हणाले. परिषदेच्या माध्यमातून आयआयटी कानपूर आणि आयआयटी मुंबई इथ कृत्रिम बुद्धिमत्ता, गुप्तवार्ता, जैवतंत्रज्ञान आणि वैद्यकशास्त्र यासाठीच्या भव्य केंद्राची सुरुवात होत आहे, असं त्यांनी सांगितलं. भारताच्या उज्ज्वल भविष्यासाठी विद्यार्थी घडवण्याच्या दृष्टीनं नवीन शैक्षणीक धोरण राबवलं जात आहे असं सांगत त्यांनी या धोरणाची वैशिष्ट्य आणि त्यातून शिक्षणक्षेत्रात होत असलेले बदल नमूद केले.

***पीएम इ विद्या और दीक्षा प्लेटफॉर्म के तहत वन नेशन वन डिजिटल एजुकेशन इंफ्रास्ट्रक्चर का निर्माण किया गया है। ये इंफ्रास्ट्रक्चर ए आई बेस्ड हैं और स्कैलेबल भी है। इसका इस्तेमाल देश की 30 से ज्यादा भाषाओं और सात विदेशी भाषाओं में, टेक्स्ट बुक्स तैयार करने के लिए हो रहा है। नेशनल***

***क्रेडिट फ्रेमवर्क के जरिए स्टूडेंट्स के लिए अलग अलग विषयों को एक साथ पढ़ाना आसान हो गया है।***

युग्मच्या माध्यमाने विकसित भारत @2047साठी राष्ट्रीय नवोन्मेषाच्या आराखड्याला चालना देणे हे या परिषदेचं उद्‌दिष्ट आहे.

वेव्हज्

वेव्हज् २०२५ परिषदेमुळ देशातल्या तरुणांना खूप लाभ होईल, असं माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन यांनी म्हटलं आहे. वेव्हजच्या केंद्रस्थानी आजची तरुणाईच असून कौशल्यविकास, स्वयं उद्योजकता आणि जागतिक सहकार्य क्षेत्रातल्या नव्या वाटा यामुळ खुल्या होतील, असा विश्वास त्यांनी यासंदर्भातल्या लेखात व्यक्त केला.

मंत्रिमंडळ निर्णय

काश्मिरातील पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना प्रत्येकी ५० लाखांची आर्थिक मदत करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळान घेतला आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी याबाबतची घोषणा केली. सर्व प्रकारे दहशतवादाचा विरोध आणि दहशतवादामुळ मृत्यू झाला, त्यांच्या पाठिशी उभा राहण्याचा संदेश या निर्णयातून घेतल्याच मुख्यमत्र्यांनी सांगितल....

***विशेषतः पहलगाममध्ये दहशतवादी हल्ल्यामध्ये आमचे बांधव मृत्युमुखी पडले. त्यांच्या कुटुंबाला प्रत्येकी पन्नास लाख रुपयाची मदत करण्याचा निर्णय आम्ही मंत्रिमंडळात घेतलेला आहे. यासोबत ज्यांच्या घरी शिक्षणाचा प्रश्न आहे तो शिक्षणाचा प्रश्न सोडवणे, ज्यांच्याकडे रोजगाराचा प्रश्न असेल तर त्यांच्या पाल्यांना शासकीय नोकरीमध्ये त्या ठिकाणी नोकरी देणे, अशा प्रकारचा निर्णयदेखील राज्याच्या मंत्रिमंडळाने आज घेतलेला आहे.***

यासोबतच, राज्य सरकारन इलेक्ट्रिक वाहनांच्या धोरणासही मंत्रिमंडळान मान्यता दिली आहे. प्रवासी वाहतुकीच्या ईव्ही वाहनांना अनुदान, काही विशिष्ट प्रकारच्या वाहनांना विशिष्ट मार्गावर टोलमाफी देण्याचाही निर्णय घेतला आहे. इलेक्ट्रिक वाहन वाढली पाहिजेत, चार्जिंग स्टेशनही वाढायला हवेत यासाठी

धोरणास मान्यता दिल्याच मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केल. जहाज बांधणी, जहाज दुरूस्ती आणि जहाज तोडणीसाठी स्वतंत्र धोरणासही राज्य मंत्रिमंडळान मान्यता दिली आहे. सोबतच, मागच्या काळात पीक विमा योजनेत अनेक घोटाळे पाहायला मिळाले. एक रूपयांतील पीक विमा योजनेत लाखो बोगस अर्ज करण्यात आले. त्यातून लोकांच्या निधीचा अपव्यय करणारे षडयंत्र केले गेले. गरजू शेतकरी, विम्यापासून वंचित राहावे लागू नये म्हणून सुधारित योजना आणत असल्याच मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केल.

उदंचन जलविद्युत प्रकल्प

राज्य ऊर्जा निर्मितीच्या क्षेत्रात स्वयंपूर्ण होण्याच्या दिशेन अग्रेसर आहे. उदंचन जलविद्युत प्रकल्पांमधून ऊर्जा निर्मितीसाठी शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे. हरित ऊर्जा निर्मितीसह राज्याला ऊर्जा संपन्न बनविण्यासाठी उदंचन जलविद्युत प्रकल्पांवर राज्य शासनान लक्ष केंद्रित केल आहे. जलसंपदा विभाग, महाजेनको, महाजेनको रिन्यूएबल एनर्जी लिमिटेड आणि अवादा ॲक्वा बॅटरीज प्रा. लि. या कंपन्यांमध्ये झालेल्या सामंजस्य करारामुळ महाराष्ट्र ऊर्जा निर्मितीत अधिक सक्षम होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. या पुढील काळात ऊर्जा क्षेत्रातील काम विहित कालमर्यादेत संबंधित यंत्रणांनी पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. आज झालेल्या सामंजस्य करारामुळ उदंचन जलविद्युत प्रकल्पाच्या माध्यमातून ५७ हजार २६० कोटी इतकी गुंतवणूक होणार आहे. याअंतर्गत राज्यात ८ हजार ९०५ मेगावॅट क्षमतेचे उदंचन प्रकल्प उभारले जाणार आहेत. या प्रकल्पातून ९ हजार २०० इतकी रोजगार निर्मिती होणार आहे....

***नऊ साइट्सवर पंप स्टोरेजेस चे करार आपण केलेले आहेत. ज्यातनं जवळपास आठ साडेआठ हजार मेगावाट वीज निर्मिती आपण करू शकणार आहोत. नऊ वेगवेगळ्या साईटसवर हे पंप स्टोरेज तयार होणार आहे. याच्यामुळे आता पंप स्टोरेज या क्षेत्रामध्ये सर्वाधिक जनरेशन करणारा राज्य हे आपलं महाराष्ट्र होणार आहे आणि आपल्याला कल्पना आहे की ही क्लीन एनर्जी आहे, ग्रीन एनर्जी आहे. त्यामुळे एक मोठा फायदा याचा महाराष्ट्राला होणार आहे.***

## वाहतूक पोलिस

नागपूर शहर पोलीस आयुक्तालयाच्या वतीन वाहतूक विभागातील पोलिस अधिकारी आणि अंमलदार यांच्या आरोग्य आणि सुरक्षेसाठी महत्त्वपूर्ण उपक्रम राबवण्यात आला.या उपक्रमांतर्गत नागपूर शहर पोलीस आयुक्त डॉ. रविंद्र कुमार सिंगल यांच्या हस्ते वाहतूक पोलिसांना उष्माघातापासून संरक्षण मिळावे म्हणून होमिओपॅथीचे 'सनकेअर' औषध तसच रात्रीच्या अंधारात कर्तव्य बजावताना दृश्यता वाढविण्यासाठी 'शोल्डर रिफ्लेक्टर उपकरणे' वितरित करण्यात आले.या प्रसंगी 550 वाहतूक पोलीस कर्मचारी यांना या औषधांच आणि उपकरणांच वितरण करण्यात आल.

## हवामान

येत्या काही तासात विदर्भातील गडचिरोली, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर जिल्ह्यातील तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ, आणि हलका पाऊस पडण्याची शक्यता तसच विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, भंडारा जिल्ह्यातील काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता देखील नागपूरच्या हवामान विभागान वर्तवली आहे.

## आयपीएल क्रिकेट

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज दिल्ली कॅपिटल्स विरुद्ध कोलकाता नाईट रायडर्स हा सामना दिल्लीत रंगणार आहे. सामना संध्याकाळी साडेसातला सुरु होईल. काल झालेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्सन गुजरात टायटन्सचा आठ गडी राखून पराभव केला.

## हिंदी विश्वविद्यालय

वर्धा इथल्या महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात नियोजन प्रकोष्ठच्या वतीन आयोजित विशेष रोजगार शिबिरात विश्वविद्यालयाच्या विविध विभागांमधील १२ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. हैदराबाद येथील एस्सेस लिवलीहूड या स्वयंसेवी संस्थेला विश्वविद्यालयात आमंत्रित करण्यात आल होत. संस्थेन विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा आणि मुलाखत घेतली, यात एकूण १२ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

*****